## एसी लोकलच्या छतातून संततधार, प्रवासी हैराण

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील वातानुकूलित लोकल सातत्याने चर्चेत आहे. कधी तांत्रिक बिघाड तर कधी प्रवाशांच्या गर्दीमुळे होणारा उकाडा; तसेच प्रवासी लटकत असल्याने दरवाजे बंद न झाल्याने होणारा लोकल खोळंबा असे प्रकार घडत असतानाच सोमवारी एसी लोकलच्या छतातून चक्क पाणी गळू लागले. विरार-चर्चगेट एसी लोकलमधील एका डब्यात सकाळी सव्वासातच्या सुमारास गळतीमुळे पाण्याची धार लागली होती. विरारहून लोकल निघाल्यावर थेंब थेंब गळणारे पाणी बोरिवलीपर्यंत संततधारेच्या रूपात बरसू लागले. पाऊस नसताना लोकलमध्ये पाणी साचू लागल्याने प्रवासी हैराण होते. कृष्णा दगर प्रवाशाने याची व्हिडीओसह माहिती प्रसारित करीत पश्चिम रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांना टॅग केले. त्यानंतर पश्चिम रेल्वेने व्हिडीओची तपासणी सुरू केली. पाणीगळतीची तक्रार बोरिवली स्थानकात प्राप्त झाली. त्यानंतर ही लोकल अंधेरी स्थानकात दाखल होताच याबाबतची दुरुस्ती हाती घेण्याच्या सूचना रेल्वे कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. ही जलद लोकल असल्याने अंधेरी स्थानकात थांबा होता. दरम्यान सकाळी सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास छताची पाहणी केली असता कम्प्रेसरमधून पाण्याची गळती होत असल्याचे समोर आले.



## शौचालय बांधणी प्रकल्पाला महापालिकेची स्थगिती

### पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांचा विरोध

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेतर्फे १४ हजार शौचकुप बांधणी प्रकल्प हाती घेण्यात येणार होता. मात्र पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावर प्रश्न उपस्थित करीत हरकत घेतल्याने तूर्तास या प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली आहे. पारंपरिक पद्धतीच्या कास्ट इन सीटू आणि विटांचे बांधकाम असणाऱ्या शौचालयांना गळती लागते, तसेच अशा शौचालयांच्या देखभालीवर खर्चही मोठ्या प्रमाणात येतो असे लोढा यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्री कास्ट तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश लोढा यांनी महापालिकेला दिले असल्याचे सांगण्यात आले.

महापालिकेतर्फे लॉट १२ अंतर्गत झोपडपट्ट्यांमध्ये आरसीसी पद्धतीच्या नवीन शौचालयांत सुमारे १४ हजार शौचकूपे बांधली जाणार आहेत. यासाठी ४८८ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे १२०० शौचालयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामासाठी सुमारे २०० कंत्राटदारांनी बोली लावल्याचे सांगण्यात येते. या शौचालयांचे बांधकाम केले जाणार आहे, त्या बांधकाम पद्धतीवर पालक मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पालिका आयुक्तांना पत्र लिहून काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या पत्रात लोढा यांनी पालिकेच्या तसेच म्हाडा मार्फत बांधण्यांत येणारी शौचालये कास्ट इन सीटू पद्धतीने व विटांचे बांधकाम करून त्यावर प्लास्टर करण्यात येते. आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेतल्यास अशा शौचालयांना गळती लागल्याचे समोर आले आहे. तसेच अशा शौचालयांच्या परिरक्षणावर येणारा खर्चही अधिक आहे. त्यामुळे इतका खर्च करूनही नागरिकांना सार्वजनिक शौचालयांची सुविधा नीटपणे देता येत नसल्याचे आढळून आले आहे, असे लोढा यांनी म्हटले आहे. पूर्वीसारखीच शौचालये बांधणे म्हणजे समस्यांना सामोरे जावे लागेल, असेही लोढा यांनी स्पष्ट केले आहे.

महा पालिका क्षेत्रामध्ये सुमारे १२०० शौचालय बांधकामाची कामे हाती घेण्यात आली आहे. त्यापैकी मोठ्या जागेवर प्रथमतः सुमारे ५०० ठिकाणी प्री कास्ट तंत्रज्ञानाचा वापर करून शौचालय बांधावे व या शौचालय बांधकामाच्या निविदा प्रक्रियेला स्थगिती द्यावी, असे निर्देश लोढा यांनी आयुक्तांना दिले आहेत. दरम्यान, पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी प्रशासनावर टीका केली आहे. 'पालिकेच्या प्रशासकांकडून राज्य सरकारकडून येणाऱ्या निर्देशांवर कारभार सुरु आहे, आयुक्त स्वत: कोणताही निर्णय घेत नाहीत. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या सामान्य नागरिकांसाठी शौचालयांचा विषय खूप संवेदनशील असताना पालिकेच्या निर्णयात ही संवेदनशीलता दिसत नाही अशी टीकाही रवी राजा यांनी केली आहे.

## तलाव क्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने आजपासून 10 टक्के पाणी कपात मागे

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबईतील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या सर्वच तलाव क्षेत्रात जुलै २०२३ मध्ये चांगली पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे जलसाठ्यामध्ये समाधानकारक वाढ झाली आहे. हीच परिस्थिती ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२३ मध्ये कायम राहिल, असा अंदाज आहे. हे लक्षात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठ्यात लागू केलेली १० टक्के पाणी कपात आज बुधवार, ९ ऑगस्ट २०२३ पासून रद्द करण्यात आल्याचे.पालिकेने जाहीर केले आहे.

यंदाच्या पावसाळ्यामध्ये प्रारंभी मुंबईस पाणीपुरवठा करणाऱ्या तलाव क्षेत्रात अपूर्ण पर्जन्यवृष्टीमुळे जलसाठा घटला होता. ती स्थिती लक्षात घेऊन पर्जन्यवृष्टीत सुधारणा होईपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनातर्फे मुंबईच्या पाणीपुरवठ्यात दिनांक १ जुलै २०२३ पासून १० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय, भातसा, विहार आणि तुळशी या सात जलाशयांमध्ये मिळून संपूर्ण मुंबई महानगराला पाणीपुरवठा करण्यासाठी एकूण उपयुक्त जलसाठा १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लीटर इतका असावा लागतो. सद्यस्थितीत तलाव क्षेत्रात समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाल्याने पाणीसाठा ८० टक्क्यांहून अधिक झाला आहे. या कारणाने आता १० टक्के पाणी कपात रद्द करण्यात आली आहे.

असे असले तरी, ऑगस्ट व सप्टेंबर २०२३ मध्ये काही प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यास, त्याप्रमाणे योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे महानगरपालिका प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

तलाव क्षेत्रात ३०६ दिवस पुरेल इतका जलसाठा उपलब्ध होत असला तरी, नागरिकांनी पाण्याचा वापर काळजीपूर्वक करावा, असे आवाहनही महानगरपालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## उद्यान एक्स्प्रेसमधून तरुणीला ढकलले; आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी
■ मुंबई

पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या उद्यान एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या एका महिलेची बॅग चोरून पळून जाताना महिलेला एक्स्प्रेसमधून ढकलून दिल्याची घटना रविवारी रात्री दादर स्थानकात उघडकीस आली. सुदैवाने तरुणी बचावली असून रेल्वे पोलिसांनी मनोज चौधरी (रा. मध्य प्रदेश) याला या प्रकरणी अटक केली आहे.



रविवारी दुपारी एक तरुणी पुणे रेल्वे स्थानकावरून उद्यान एक्स्प्रेसच्या लेडीज डब्यात बसली. एक्स्प्रेस रविवारी रात्री दादर रेल्वे स्थानकावर आली असता, डब्यातील सर्व महिला उतरल्यानंतर संबंधित तरुणी एकटीच असल्याचे पाहून चोराने तिचा विनयभंग करत तिची बॅग खेचण्याचा प्रयत्न केला, तिने प्रतिकार केल्याने झटापटीत त्याने त्या तरुणीला गाडीतून खाली ढकलून दिले. ती फलाट क्रमांक ६ वर पडली. जखमी अवस्थेत तिला हॉस्पिटलला नेण्यात आले.तक्रारीनंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासत मनोजला सीएसटीएम स्थानकातून ताब्यात घेतले. मनोज हा मूळचा मध्य प्रदेशचा असून तो पुणे येथे खासगी सुरक्षारक्षक म्हणून काम करत होता. पगार न मिळाल्याने त्याने नोकरी सोडली. तो पुन्हा गावी जाणार होता. गावी जाताना लुटमार करण्यासाठी तो डब्यात शिरला होता. सीसीटीव्ही फुटेजच्या साह्याने चोराला पकडण्यात आल्याचे दादर लोहमार्ग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री स्वच्छ मुंबई हेल्पलाईनला देशपातळीवरील सुवर्ण पदक




प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री स्वच्छ मुंबई हेल्पलाईनच्या माध्यमातून मुंबईकरांना कचऱ्याशी संबंधित तक्रारींचे निवारणाची आधुनिक सुविधा दिल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेला सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले आहे. ईटी गव्हर्मेंट डिजिटेक कॉन्क्लेव्ह एण्ड अवॉर्ड २०२३ या गोव्यात नुकत्याच पार पडलेल्या परिषदेत हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरी सेवा देतानाच माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेला या सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले आहे. या कामगिरीबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक इकबाल सिंह चहल आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) आश्विनी भिडे यांनी माहिती तंत्रज्ञान विभागाचे कौतुक केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील रस्त्यांवर तसेच अंतर्गत भागातही कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी सहज, सोपी व जलद यंत्रणा विकसित करावी, अशा सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाला केल्या होत्या. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक इकबाल सिंह चहल आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) आश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली हेल्पलाईनच्या निर्मितीला सुरूवात झाली. नागरी तक्रारी निवारणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड घेऊन नागरिकांच्या सुविधांमध्ये भर घालण्याच्या अनुषंगाने हेल्पलाईन विकसित करण्यासाठी उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्रीमती चंदा जाधव तसेच संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. शरद उघडे यांच्यासह संपूर्ण टीमने अथक प्रयत्न केले. माहिती तंत्रज्ञान विभागाने गत वर्षभरात मुंबईकरांच्या सेवेत तंत्रज्ञानावर आधारीत विविध नागरी सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री स्वच्छ मुंबई हेल्पलाइन विशेष उल्लेखनीय ठरली आहे.

मुख्यमंत्री स्वच्छ मुंबई हेल्पलाईनच्या माध्यमातून एक अद्ययावत अशी तक्रार निवारण यंत्रणा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने विकसित केली आहे. सोबत एक डॅशबोर्ड विकसित करण्यात आला आहे. सोप्या आणि सहजपणे तक्रार दाखल करण्याची ही पद्धत आहे. एक गुणवत्तापूर्ण आणि परिणामकारक सेवा देणारी हेल्पलाईन अशी ख्याती या सेवेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. या हेल्पलाईनला देशपातळीवरील पुरस्कार मिळाल्याने त्याच्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

शासकीय यंत्रणेत तंत्रज्ञानाची सुविधा देणाऱ्यांचा गौरव करणारे पुरस्कार म्हणून ईटी गव्हर्नमेंट डिजिटेक अवॉर्डची ख्याती आहे. यंदाच्या पुरस्कारांसाठी देशभरातून ३७० संस्थांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये निवडण्यात आलेल्या १६० स्पर्धकांमध्ये पालिकेने आपले स्थान निश्चित केले होते. तंत्रज्ञानाची अंमलबजावणी, नावीण्यपूर्णता तसेच नागरी सेवांमध्ये सुधार होतानाच नागरिकांचा सहभाग यासारख्या निकषांवर आधारित अंतिम मोजक्या स्पर्धकांची निवड करण्यात आली होती.

## पालिकेच्या मनमानी कारभारा विरोधात सफाई कामगारांनी काढला मोर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेत काम करणाऱ्या सफाई कामगारांना सहा वर्षापूर्वी दिलेले नियुक्ती पत्र रद्द करण्याच्या हालचाली पालिका प्रशासनाने सुरु केल्या आहेत. १६०० कामगारांना कायम कामगार म्हणून नियुक्ती केली ही चूक झाली. न्यायालयाने तसे आदेश दिलेले नव्हते तर फक्त थकबाकी देण्याचे आदेश दिले होते, अशी भूमिका घेत प्रशासनाकडून घुमजाव केले जात आहे, प्रशासनाच्या या मनमानी कारभारा विरोधात कचरा वाहतूक श्रमिक संघाच्या नेतृत्वाखाली काल सफाई कामगारांनी मोर्चा काढला होता. या मोर्चाचे नेतृत्व कचरा वाहतूक श्रमिक संघाचे सरचिटणीस मिलिंद रानडे यांनी केले.

पालिकेत सफाई कामगारांना कायम नोकरीसाठी २००७ साली कचरा वाहतूक श्रमिक संघाने औद्योगिक न्यायालयात केस दाखल केली होती. त्याचा निकाल न्यायालयाने २०१४ साली कामगारांच्या बाजूने दिला. पालिकेने त्याची अंमलबजावणी न करता उच्च न्यायालयात अपिल केले. मात्र या अपिला विरोधात न्यायालयाने २०१६ मध्ये निर्णय दिला. पालिका प्रशासनाने या निर्णया विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. १६०० कामगारांना कायम कामगार म्हणून नियुक्ती केली ही चूक झाली. न्यायालयाने तसे आदेश दिलेले नव्हते तर फक्त थकबाकी देण्याचे आदेश दिले होते. मात्र १६०० कामगारांना नियुक्तीपत्र देऊनही आता घुमजाव करीत असल्याचे कचरा वाहतूक श्रमिक संघाने म्हटले आहे. सहा वर्षापूर्वी दिलेले नियुक्ती पत्र रद्द करण्याची भूमिका घेऊन कामगारांवर हा सूड उगवला जातो आहे का असा सवाल युनियनचे नेते मिलिंद रानडे यांनी विचारला आहे.

## वर्सोवा बोट दुर्घटनेतील मृतदेह 60 तासानंतर आढळला

**मुंबई:** वर्सोवा वेसावे गावातील देवाचीपाडा येथील समुद्रात मासेमारी करुन परताना शनिवार ६ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता होडी बुडाली. या होडीत तिघे जण होते, त्यापैकी एक जण पोहत समुद्र किनारी आल्याने बचावला. तर दुसऱ्या बेपत्ता मुलाचा रविवारी दुपारी शोध लागला असता कूपर रुग्णालयात पाठवण्यात आले. मात्र त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर तिसरा बेपत्ता मुलगा ६० तासानंतर वर्सोवा चौपाटीवर आढळला. त्याला जवळील शताब्दी रुग्णालयात दाखल केले असता रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी मृत्यू झाल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. वेसावे गावातील देवाचीवाडीमधील विजय बमानिया (३५), उशानी भंडारी (२२) आणि विनोद गोयल (४५) हे मासेमारीहुन शनिवारी रात्री ८ च्या सुमारास परतत असताना त्यांची होडी वर्सोवा किनाऱ्यापासून ३ किलोमीटरवर बुडाली. यातील विजय बमानिया याने पोहत येऊन मढ किनारा गाठला. त्यानंतर अग्निशमन दल, जीवरक्षक, स्थानिक मच्छीमारांनी बुडालेल्या उस्मानी भंडारी आणि विनोद गोयल यांचा शोध सुरू होता. दरम्यान, दुपारी यातील विनोद गोयल यांचा मृतदेह जीवरक्षकांच्या हाती लागला. तो कूपर रुग्णालयात पाठवण्यात आला. विनोद गोयल यांचा मृत्यू झाला. तर तब्बल ६० तासानंतर उशानी भंडारी हा वर्सोवा चौपाटीवर आढळला असता कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## उद्घाटनानंतरही आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह बंदच; राष्ट्रवादी आक्रमक

### मुंबई विद्यापीठाचा बेभान कारभार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई विद्यापीठाने सांताक्रुझ येथील कलिना संकुलात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे वसतिगृह उभे केले. त्याचे उद्घाटन जुलै २०२२ मध्ये तत्कालीन कुलपती व माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. परंतु एक वर्षाच्या कालावधीनंतरही हे वसतिगृह विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आलेले नाही.

नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाले तरीही अद्याप हे वसतिगृह वापरात आलेले नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रवक्ते अॅड. अमोल मातेले यांनी विद्यापीठाच्या कार भारावर रोष व्यक्त केला आहे.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीचे नवीन वसतिगृह हे सहा मजली आहे. १४६ विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या या वसतिगृहात वाचन कक्ष, ग्रंथालय आदी सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत. सध्या मुंबई विद्यापीठातील विविध विभाग आणि संलग्नित महाविद्यालयात जवळपास २०० आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिकत आहेत.

या विदयार्थ्यांना कलिनापर्यंतचा प्रवास दूरवरून करावा लागत आहे. ज्यामुळे विदयार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान होत आहे. विदयापीठातील मुलांचे आंतरराष्ट्रीय वसतिगृह सुरु केले तर विदयार्थ्यांचा प्रवासाचा खर्च आणि वेळ वाचेल याची जाणीव ठेऊन लवकरात लवकर सुरु करावे अशी मागणी अॅड. अमोल मातेले यांनी कुलगुरूंना ई-मेल द्वारे पत्र पाठवून केली आहे.

SBI Securities
Investment aur Trust, Dono
एसबीआयकॅप सिक्युरिटीज लमिमिटेड
१२ वा मजला, युनिट क्र. १२०१, बी-विंग, मेरेथन फ्युच्यूरेक्स, एन. एम. जोशी मार्ग, लोवर परेल (पू), मुंबई – ४०००१३

शुद्धिपत्रक

निविदा सादरीकरण दिनांकाचा विस्तार

१. एसबीआयकॅप सिक्युरिटीज लि. नवी मुंबई, सीबीडी बेलापूरमधील शाखा कार्यालयासाठी लीझ भाडेतत्वावर साधारणपणे २००० चौ.फू. (लवटोरी, लिफ्ट लॉबी इत्यादी वगळता) चटई क्षेत्र मोजमाप असलेल्या व्यावसायिक/ कार्यालयीन जागेसाठी मालक/ पॉवर ऑफ अॅटॉर्नी धारक ह्यांच्याकडून दोन बोली पद्धतीमध्ये मागवण्यात येत आहेत.
२. ख़जागा सीबीडी रेल्वे स्थानकाजवळ प्रामुख्याने मध्यवर्ती (५०० मीटरच्या परिसरात), पर्याप्त पार्किंगच्या जागेसह व्यावसायिक आस्थापनांच्या समूहामध्ये असावी त्याचप्रमाणे ताबोडतोब ताबा मिळण्यासाठी तयार / लवकरच तयार होणारी असल्यास प्राधान्य असेल.
३. विहित स्वरूपातील बोलींचे अर्ज आमच्या कार्यालयामधून प्राप्त करता येतील किंवा आमच्या www.sbisecurities.in/request ह्या संकेतस्थळावरून प्रस्तावांसाठी डाउनलोड करता येईल. मोहरबंद बोली उपरोक्त पत्त्यावर सादर करता येतील.
४. एसबीआय कॅप सिक्युरिटीज लिमिटेडने उपरोक्त निविदा सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ बदलण्याचा निर्णय घेतला असून सादरीकरणासाठी बदलेला दिनांक आणि वेळ १६ ऑग २०२३ रोजी सायं. ४.०० वा. पर्यंत आहे. तांत्रिक बोली त्याच दिवशी ४.१० वा. ते ४.३० वा. दरम्यान उघडण्यात येतील.
५. कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणताही प्रस्ताव नाकारण्याचे अधिकार कंपनी राखून ठेवत आहे.

प्रशासकीय प्रमुख

पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३ ई-मेल : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२३/प्र.क्र. ३०५/३११/२०२३ दिनांक : ०८/०८/२०२३

जाहीर सुचना

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी – १ नमुन्यात मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १) | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ०३ मधील पापडीचा पाडा गावातील श्री. प्रल्हाद घरत यांचे घरापासुन ते श्री. प्रकाश पवार यांच्या घरापर्यंत नवीन RCC गटार बनविणे. | ७,०७,४८५/- (Without GST) | ७१००/- | ५००+९०=५९० | २ महिना |

याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक ०९/०८/२०२३ पासुन दि. १८/०८/२०२३ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.
१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.
२) सीलबंद निविदा दि. १८/०८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.
३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि. १८/०८/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

जा.क्र पमपा/बांधकाम/६५२३/प्र.क्र.६६/२९१८/२०२३
दि. ०८/०८/२०२३.

## महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाची उलाढाल दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवावे - धनंजय मुंडे

### कृषी विभागाच्या भूखंडांवर शेतकरी व ग्राहक उपयोगी उपक्रम राबवणार

प्रतिनिधी
■ मुंबई

शेतकऱ्यांना लागणाऱ्या खते, कीटकनाशक, कृषी अवजारे तसेच शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या मालावरील प्रक्रिया उद्योग यामधील नाविन्यता शोधून महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाची उलाढाल पुढील वर्षापर्यंत दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे निर्देश कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित या महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या अधिनस्त असलेला महामंडळाच्या आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते मंत्रालयात पार पडलेल्या या बैठकीस कृषी विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषी आयुक्त सुनील चव्हाण, महाराष्ट्र कृषी उत्पन्न विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक



सुनील चव्हाण, उपमहाव्यवस्थापक सुरेश सोनवणे, सुजित पाटील, ज्योती देवरे, महेंद्र बोरसे, महेंद्र धांडे देवानंद दुथडे, गणेश पाटील यांच्यासह महामंडळाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

महामंडळाची 13 विभागीय कार्यालये आणि 10 उत्पादन घटक कार्यरत आहेत. त्यामध्ये खत कारखाने, पशुखाद्य कारखाने, एम.आय.एल, कृषी अभियांत्रिकी कारखाना यांचा समावेश आहे. या कारखान्यांमध्ये उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल घटक केंद्र सरकारद्वारे नियंत्रित प्रमाणात वितरित केले जात असल्याने दरवर्षी उत्पादन कमी होत असल्याची बाब अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिली. त्यावर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने कालबाह्य असलेल्या उत्पादनांचे कारखाने बंद करण्याची प्रक्रिया सुरू करावी व त्याऐवजी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उत्पादने सुरू करण्याबाबत अभ्यास करून प्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिले.

त्याचबरोबर महामंडळ आणि कृषी विभागाच्या अधिनस्त असलेल्या जागा विना वापर पडून असून काही ठिकाणी अतिक्रमण वाढत आहे. अशा जागांचा अभ्यास करून त्यावर शेतकरी आणि कृषी विभाग यांच्यासाठी उपयोगी ठरतील, असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश मंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले.

REMSONS INDUSTRIES LIMITED
सीआयएन: एल५१९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१
नोंदणी. कार्यालय: ४०१, ४ था मजला, ग्लॅडोलिया हनुमान रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.
दूर. क्र.: ०२२-२६२६२१००, २६११२२३६८, ई – मेल आयडी: corporate@remsons.com, संकेतस्थळ: www.remsons.com

३० जून २०२३ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अ-लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

रु. लाखामध्ये (ईपीएस वगळता)

| तपशिल | एकमेव | | | | एकत्रिकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष |
| | ३० जून २०२३ (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२३ (लेखापरीक्षित) | ३० जून २०२२ (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२३ (लेखापरीक्षित) | ३० जून २०२३ (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२३ (लेखापरीक्षित) | ३० जून २०२२ (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२३ (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून /एकूण उत्पन्न (निव्वळ) | ६,०३१.५३ | ६,३८२.१७ | ६,४८५.०७ | २६,५६६.०४ | ७,३१२.३९ | ७,७०७.४५ | ७,९७५.६५ | ३१,४३९.५४ |
| कर पूर्व सामान्य कार्यामधून निव्वळ नफा/ (तोटा), अपवादात्मक आणि / किंवा अपवादात्मक बाबी | १८३.५४ | २७२.८७ | १४८.९४ | १,०५७.५९ | २७३.११ | ४१८.६६ | ३१९.६६ | १,२०५.५८ |
| कर पूर्व कालावधीसाठी अपवादात्मक बाबी पश्चात सामान्य कार्यामधून निव्वळ नफा/ (तोटा) | १८३.५४ | २७२.८७ | १४८.९४ | १,०५७.५९ | २७३.११ | ४१८.६६ | ३१९.६६ | १,२०५.५८ |
| कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक बाबी पश्चात ) | १२५.१९ | १९६.०२ | १०९.१४ | ७७५.५६ | १९४.५८ | २५५.२९ | २६५.२३ | ८३७.०१ |
| कालावाधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात) आणि अन्य एकत्रित उत्पन्न (कर पश्चात)]" | १२४.३६ | १९६.६३ | १०६.३६ | ७६७.२५ | २४३.६८ | २६३.१६ | १७२.४० | ८३०.७७ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (रु. १०/- दर्शनी मूल्याचे) | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ |
| राखीव (हिशोबाच्या गत वर्षाच्या ताळेबंदाच्या अनुसार पुंरामुल्यांकित राखीव) | ३१ मार्च २०२३ अनुसार | | | ३,५९९.२२ | | | | ३,६५५.२६ |
| " प्रति समभाग उत्पन्न (रु. १०/- प्रत्येकीचे) - | | | | | | | | |
| १. मूळ : (रु.) | २.१९ | ३.४३ | १.९१ | १३.५७ | ३.४१ | ४.४७ | ४.६४ | १४.६५ |
| २. सौम्यीकृत: (रु.)" | २.१९ | ३.४३ | १.९१ | १३.५७ | ३.४१ | ४.४७ | ४.६४ | १४.६५ |

टिप:
१. वित्तिय निष्कर्षाचे लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे ८ ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये ते नोंदपटावर घेण्यात आले आहेत. वित्तिय निष्कर्ष कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ आणि अन्य लागू असलेल्या लेखा परीक्षण आणि धोरण अंतर्गत विहित करण्यात आलेल्या भारतीय लेखा मानांकन (इंड – एएस) च्या अनुषंगाने तयार करण्यात आला आहे.
२. ३० जून २०२३ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी अ-लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा उपरोक्त हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) तपशिलवार आराखडा आहे. संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीचा पूर्ण आराखडा कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.remsons.com आणि बीएसई लि. म्हणजेच www.bseindia.com आणि नॅशनल स्टक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) वर उपलब्ध आहे.

रेमसन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करीता
सही/-
कृष्णा केजरीवाल
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन – ००५१३७८८)

ठिकाण: मुंबई
दिनांकित: ८ ऑगस्ट २०२३